# नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (परिवहन विभाग)

जाहिरात क्र./१२४७/पी.आर | दिनांक :-२०/०६/२०२४

## शुद्धीपत्रक

**वाचा :- जाहीरात क्रमांक : १२४७/पी.आर दि. १५.०३.२०२४**

नागपूर महानगरपालिकेत परिवहन विभागाचे बळकटीकरण करण्यासाठी व नवीन दाखल होणारी Electric Buses च्या नियोजनासाठी तसेच नागरिकांना उत्तम अशी Public Transport Services उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन विभागांतर्गत प्रशासकीय व तांत्रिक बाबींबाबत दिर्घ अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची गरज आहे. यास्तव निव्वळ कंत्राटी तत्वावर खालील पदाकरिता **यापूर्वीच्या दि.१५.०३.२०२४ च्या संदर्भीय जाहिरातीत एकमुस्त मासिक मानधनाच्या आधारे थेट मुलाखती नियोजीत होत्या. त्या जाहिरातीतील एकमुस्त मानधानाची अट रद्द करुन** या पदावर कंत्राटी / करार तत्वावर शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ व सुधारीत शासन निर्णय दि. ०८/०९/२०२३ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ११ महिन्याच्या कालावधीकरिता थेट मुलाखतीद्वारे तात्पुरती नियुक्ती करावयाची आहे.

त्याअनुषंगाने यापूर्वीच्या संदर्भीय जाहिरातीनुसार अर्ज मागविण्यात आले होते व दि.२७/०३/२०२४ रोजी थेट मुलाखत नियोजीत करण्यात आली होती. तथापी प्रशासकीय कारणामुळे उक्त दिवशी मुलाखती घेण्यात आल्या नाहीत. करिता नमुद पदांकरिता दि.२६/०६/२०२४ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० वाजेपर्यंत थेट मुलाखतीकरिता पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन, आयुक्त, नागपुर मनपा यांचेकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत यापुर्वीच्या जाहिरातीचे अनुषंगाने ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केला आहे, **त्यांनी वेगळ्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नसुन पात्रतेनुसार** संबंधीतांनी देखील नियोजीत दिनांकास थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

| अ. क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी व्यवस्थापक (प्रशासन) | ०१ | कमाल ६५ वर्ष | १) शासकीय/निमशासकीय/ परिवहन उपक्रम (राज्यशासन/स्थानिक स्वराज्य संस्था) किमान १० वर्षे प्रशासकीय कामाचा वर्ग - १ / वर्ग - २ पदावरील अनुभव<br>२) कामगार कायदे, कामगार कल्याण, विधी विषयक, परिवहन विषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| २ | कंत्राटी व्यवस्थापक (ऑपरेशन्स) | ०१ | | १) शासकीय/निमशासकीय/ परिवहन उपक्रम (राज्यशासन/स्थानिक स्वराज्य संस्था) किमान १० वर्षे प्रशासकीय कामाचा वर्ग - १ / वर्ग - २ पदावरील अनुभव<br>२)परिवहन विषयक व्यवस्थापनाचा किमान १० वर्षाचा अनुभव |
| ३ | कंत्राटी व्यवस्थापक (अभियांत्रिकी) | ०१ | | १) शासकीय/निमशासकीय वर्ग - १ / वर्ग - २ Mechanical Engineer पदाचा किमान १० वर्षाचा अनुभव<br>२)डेपो / कारखाना देखभाल / व्यवस्थापन / उभारणी तसेच संदर्भातील अनुभव आवश्यक<br>३) इलेक्ट्रिक वाहने चार्जिंग स्टेशनबाबत अनुभव असल्यास प्राधान्य |
| ४ | कंत्राटी लेखा अधिकारी | ०१ | | महाराष्ट्र शासनाच्या वित्त व लेखा विभागात किंवा इतर शासकीय/निमशासकीय वर्ग - १ / वर्ग - २ लेखा व वित्त विषयक पदाचा विभागात १० वर्षे अनुभव |

वरील उमेदावारांनी दि.२६/०६/२०२४ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आयुक्त, नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि. २६ /०६/२०२४ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

४. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्राच्या छायाप्रती स्वसाक्षांकीत करून जोडाव्यात.

५. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च **परिवहन विभागाच्या आस्थापनेवरून काढण्यात येईल.**

६. उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

८. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

९. मासिक पारिश्रमिक-शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यासारख्या संस्था या सारख्या संस्थेतून सेवा-सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपद्धतीचे पालन करून करार पद्धतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेल्या मुळ निवृत्तीवेतन आधारे शासन निर्णय दि. ०८/०९/२०२३ चे तरतुदीनुसार त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे. आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्ष) कायम राहील.

१०. ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनात नाहीत त्यांना करार पध्दतीने नियुक्त करतांना, सेवानिवृत्तीपुर्वी / मिळत असलेल्या अंतिम वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाच्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रामिक निश्चित करण्यात येईल.

११. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

१२. सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही गंभीर शिक्षा झालेली नसावी अथवा सुरु नसावी.

१३. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवसाठी त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

**हस्ता/- डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /२०२४

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ....................................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ....................................................................................

३. पूर्ण पत्ता :- ....................................................................................

....................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ....................................................................................

ई-मेल आय डी :- ....................................................................................

४. जन्म दिनांक :- ....................................................................................

५. दि. १४/०६/२०२४ ला वय :- ....................................................................................

६. सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद व कार्यालय :- ....................................................................................

७. शैक्षणिक पात्रता :- ....................................................................................

८. अ) सेवाकाळातील विभागीय चौकशी सुरु आहे/ होती काय ?

ब) असल्यास विभागीय चौकशीत शिक्षा झाली होती का ?

क) अर्जदारा विरुध्द कोणताही गुन्हा दाखल आहे का ?

ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील

९. अनुभव :- ....................................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner